www.rajdand.com
सातारा रविवार
३. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

## बन्सुरी स्वराज यांना लोकसभेचं तिकीट

**दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षाने दिल्लीतील पाच जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. यावेळी भाजपने नवी दिल्लीतून दिवंगत नेत्या सुषमा स्वराज यांच्या कन्या बन्सुरी स्वराज यांना तिकीट दिले आहे.

गेल्या वर्षी, त्या दिल्ली राज्याच्या कायदा सेलच्या राज्य समन्वयक बनल्या. गेल्या वर्षी २६ मार्च रोजी बन्सुरी स्वराज यांना भाजपने दिल्ली राज्याच्या कायदा कक्षाचे राज्य सहसंयोजक बनवले होते. त्यानंतर आता त्यांच्या खांद्यावर लोकसभा निवडणुकीची मोठी जबाबदारी आली आहे. नवी दिल्ली सीट ही दिल्लीच्या खास जागांपैकी एक आहे. सध्या मीनाक्षी लेखी या जागेवर खासदार आहेत. पण यावेळी त्यांचे तिकीट कापून या जागी भाजपने बन्सुरी स्वराज यांना तिकीट दिले आहे.

## बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी होणाऱ्यांवरही कारवाई करा- रुपाली चाकणकर

**कोल्हापूर :** बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करा. लग्नपत्रिका छापणारे प्रिंटिंग प्रेस मालक, विवाह होणारे मंगल कार्यालय व समाज मंदिरांबरोबरच त्या गावचे सरपंच व ग्रामसेवकांवरही कारवाई करा, अशा सूचना देवून हे निर्देश तात्काळ सर्वांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी दिल्या.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात बैठक झाली, यावेळी पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, साधना पाटील, शिल्पा पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी एस.एस. वाईंगडे उपस्थित होते.

# शरद पवारांचे आगमन अन् भाषणावेळी प्रेक्षकांचा शिट्ट्यांसह जल्लोष

**बारामती :** बारामती येथील नमो महारोजगार मेळाव्याप्रसंगी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे आगमन झाल्यानंतर, तसेच त्यांचा सत्कार करताना व ते भाषणात उभे राहिल्यानंतर उपस्थित प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट, शिट्ट्या वाजवत जल्लोष करण्यात आला. शरद पवार यांच्या नमो महारोजगार मेळाव्याच्या उपस्थितीमुळे अनेकांना धक्का बसला होता. या मेळाव्याच्या ठिकाणी व्यासपीठावर शरद पवार यांचे आगमन होताच उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्या आणि शिट्ट्या वाजवून जल्लोष केला. पवार यांनी देखील उपस्थित प्रेक्षकांना हात उंचावून प्रतिसाद दिला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुप्रिया सुळे यांचे आगमन झाल्यानंतर देखील उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. या प्रेक्षकांमध्ये विशेषतः तरुण वर्ग व बारामतीकरांनी जल्लोष केला. पवार यांचे स्वागत होत असताना व त्यांनी भाषणात सुरुवात केल्यानंतर देखील प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून जल्लोष केला. प्रेक्षकांच्या या जल्लोषाची चर्चा माध्यमांमध्ये चांगलीच रंगली. उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुप्रिया सुळे यांच्या स्वागता वेळी देखील प्रेक्षकांनी जल्लोष केला. मात्र सर्वाधिक



जल्लोष शरद पवार यांच्या आगमनावेळी व स्वागतावेळी प्रेक्षकांनी केला.

नमो महारोजगार मेळाव्यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे निमंत्रण पत्रिकेमध्ये ऐनवेळी नाव टाकण्यात आल्याने माध्यमांसह सर्वांचेच लक्ष या मेळाव्याकडे लागले होते. अखेर शरद पवार यांनी या मेळाव्याला उपस्थित राहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सभा मंडपाच्या प्रवेशद्वारावर थांबून पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवरांचे स्वागत केले.

शरद पवार अध्यक्ष असलेल्या विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलाच्या मैदानावर नमो महाराज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या निमंत्रण पत्रिकेमध्ये सुरुवातीला शरद पवार यांचे नाव नसल्याने सर्वत्र उलटसुलट चर्चांना उधाण आले होते. या मेळाव्याच्या दोन दिवस अगोदर स्वतः शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना पत्राद्वारे गोविंद बाग या आपल्या निवासस्थानी स्नेह भोजनाचे निमंत्रण दिले होते. विद्या प्रतिष्ठान या संस्थेचा अध्यक्ष व संसद सदस्य या नात्याने आपणास नमो महा रोजगार मेळाव्यानिमित्त मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री व इतर मान्यवरांचे स्वागत करण्यास आपणास आवडेल, तसे या पत्रामध्ये शरद पवार यांनी म्हटले होते. पवार यांच्या या पत्रामागे राजकीय खेळी काय असा सवाल या निमित्ताने व्यक्त केला जात होता. या कार्यक्रमाच्या एक दिवस अगोदर जिल्हा प्रशासनाने या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका प्रसिद्ध केली होती यामध्ये नव्याने शरद पवार यांचे नाव प्रमुख उपस्थिती मध्ये समाविष्ट करण्यात आले होते. त्यामुळे या कार्यक्रमास शरद पवार उपस्थित राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

मात्र या कार्यक्रमापूर्वीच सकाळी लवकर शरद पवार विद्या प्रतिष्ठानच्या कार्यालयात बैठकीसाठी दाखल झाले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह इतर मान्यवर दाखल होण्याच्या अगोदर स्वतः शरद पवार कार्यक्रम स्थळाच्या प्रवेशद्वारावर थांबले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे त्यांनी हस्तांदोलन करून स्वागत केले. यांचे देखील त्यांनी हस्तांदोलन करून स्वागत केले.

यानंतर मान्यवरांसोबत पवार व्यासपीठावर दाखल होताच तरुणांसह बारामतीकरांनी जोरदार टाळ्यांचा कडकडाट करत व जल्लोष करत त्यांना प्रतिसाद दिला. खासदार सुप्रिया सुळे व उपमुख्यमंत्री अजित पवार झाल्यानंतर देखील उपस्थित बारामतीकर व तरुणांनी टाळ्यांचा कडकडाट करत तसेच जल्लोष करत त्यांचे स्वागत केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खुर्ची शेजारीच शरद पवार यांची खुर्ची लावण्यात आली होती.दोघे शेजारी बसल्याने उपस्थित यांच्या भूवया उंचावल्या होत्या. शरद पवार यांनी आपल्या भाषणात विद्या प्रतिष्ठान या संस्थेचा आढावा सादर करत विद्या प्रतिष्ठान मध्ये आपण कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान प्रशिक्षण कोर्स सुरू करणार असल्याचे सांगत या क्षेत्रामध्ये राज्य सरकारचे देखील सहकार्य मिळत असल्याचे आवर्जून त्यांनी सांगितले. पिढीच्या हाताला काम देण्यासाठी राज्य सरकार जे काही उपक्रम राबवेल त्यास आपला कायम पाठिंबा राहील, असे आश्वासन देखील पवार यांनी यावेळी दिले.



# तर राजकारणातून संन्यास घेईन, चंद्रकांत पाटील यांचे वक्तव्य

**नाशिक :** पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या कामांमुळे मोदी सरकार स्ट्राँग आहे. कलम ३७० हटवणे, भारताने चंद्रावर लावलेला झेंडा यासह मोदी यांनी केलेली कामे सामान्य माणसांनाही पटतात. त्यांचे म्हणणे पटत नाही, असे म्हणत जर सामान्य पुढे आले तर सक्रिय राजकारणातून संन्यास घेईन, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीचंद्रकांत पाटीलयांनी व्यक्त केले.-ऊाएठढखडएचएछढभोसला महाविद्यालयाच्या कार्यक्रमासाठीनाशिकयेथे आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्रालयात नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे आणि आमदार थोरवे यांच्यात झालेल्या वादाबद्दल विचारले असता, त्याबद्दल माहिती नसल्याचे सांगत त्यावर प्रतिक्रिया देणे टाळले.

शिखर बँकेचे प्रकरण अजूनही न्यायालयात आहे. ते संपलेले नाही. जो काही निर्णय व्हायचा तो न्यायालयात होईल. कोणत्याही प्रकारचा अहवाल द्यायला न्यायालय स्वायत्त असल्याने निर्णय आल्यानंतर पुढची प्रक्रिया होईल, असेही पाटील म्हणाले. भारतात परदेशी गुंतवणूक वाढत आहे. चीनमधून बाहेर पडलेल्या उद्योगांनी भारताला प्राधान्य दिल्याचेही त्यांनी सांगितले.जागा वाटपासाठी भाजपमध्ये एक प्रक्रिया असते. त्यात निर्णय घेणाऱ्यांमध्ये मी नाही. कुणाचे तिकीट अंतिम झाले हे मला माहिती नाही. पहिल्या टप्प्यात केंद्रीय स्तरावरील नेत्यांचे स्थान असेल. १० तारखेच्या आत आम्हाला दौरे संपवायचे असल्याने त्यादृष्टीने देशभरात दौरे सुरू असल्याचे सांगत पाटील यांनी अप्रत्यक्षरीत्या लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाची तयारी सुरू असल्याचे संकेत दिले. याबरोबरच सर्वच ठिकाणी नेत्यांची जबाबदारी पक्की असल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांना आलेल्या धमकीबद्दल विचारले असता, त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल, असे सांगत भुसे आणि थोरवे यांच्यात झालेल्या वादाबाबत बोलण्यास त्यांनी नकार दिला.

# वैद्यकीय महाविद्यालयात जेनेरिक औषधे मिळणार

## वैद्यकीय शिक्षण विभागाची परवानगी

**मुंबई :** गेल्या काही वर्षात ब्रँडेड औषधाच्या तुलनेत जेनेरिक औषधे बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहेत. जेनेरिक औषधे ही ब्रँडेड औषधाच्या तुलनेने अधिक स्वस्त असतात त्यामुळे गरीब रुग्णांना परवडतात. विशेष म्हणजे या औषधाची गुणवत्ता सुद्धा चांगल्या प्रकारची असल्यामुळे केंद्र सरकार जेनेरिक औषधांचा मोठ्या प्रमाणत प्रसार करत आहे. त्यामुळे आता राज्यातील बहुतांश सर्वच वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयात जेनेरिक औषधाची दुकाने सुरु करण्यास वैद्यकीय शिक्षण विभागाने परवानगी दिली आहे. यासाठी त्यांच्या मार्फत तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.-ऊाएठढखडएचएछढ-वी लूगेल्या काही वर्षात औषधनिर्माण शास्त्रात मोठी प्रगती झाली आहे. तसेच अनेक रुग्णांना काही औषधे ही आयुष्यभरासाठी घ्यावी लागतात. त्यामध्ये विशेष करून रक्तदाब, मधुमेह, हृद्यविकार तत्सम आजरांचा समावेश असतो. त्यासोबत



थंडी, खोकला, ताप या नियमित आजरांसाठी रुग्ण नियमितपणे बाजारातून औषधे घेत असतात. अनेक रुग्णांना यासाठी मोठा खर्च होतो. सध्याच्या घडीला बहुतांश आजारावरील जेनेरिक औषधे आता बाजरात उपलब्ध झाली आहेत. विशेष म्हणजे ही औषधे ब्रँडेड औषधाच्या तुलनेत अधिक स्वस्त असतात. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेकांचा समज असतो कि जेनेरिक औषधे ही उपचारासाठी जास्त प्रभावी नसतात. मात्र तो समज पूर्णपणे चुकीचा आहे. ब्रँडेड आणि जेनेरिक औषधांमध्ये समान औषधी घटक असतात. त्यामुळे दोन्ही प्रकारची औषधे ही प्रभावीच असतात. त्यामुळेच शासनाने रुग्णांना जेनेरिक औषधे सहज पणे उपब्लध व्हावीत याकरिता या औषधे विक्रीकरिता वैद्यकीय महाविद्यालयाशी संबंधित रुग्णालयात विक्रीसाठी जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सध्या राज्यातील १८ वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयात जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी नॅकोफ इंडिया लिमिटेड, एच एल एल लाईफ केअर लिमिटेड, एच एस सी सी लिमिटेड या संस्थांना हे काम देण्याचा निर्णय मंत्रिमंडळात घेण्यात आला आहे. या संस्थांपैकी एक कंपनीला किंवा विभागून देण्यास मान्य देण्यात आली आहे. या संस्थामार्फत जेनेरिक औषधी केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक असणारी २०० ते २५० चौरस फूट इतकी जागा प्रथमतः १० वर्षासाठी भाडे तत्वावर उपलब्ध करण्यात येईल. त्यानंतर सदर संस्थेच्या सेवा समाधान कारक असल्यास पुढील पाच वर्ष सदर संस्थेस भाडेतत्वार देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.जेनेरिक औषधी केंद्रासाठी द्यावयाच्या जागा रुग्णालय परिसराच्या प्रथम दर्शनी भागात असावी. जागेचे क्षेत्रफळ, जागेचा भाडेपट्टा, त्याचा कालावधी तसेच त्यासाठीच्या अटी शर्ती तयार करण्याची जबाबदारी वैद्यकीय शिक्षण आयुक्तांची असणार आहे. तसेच संबंधित संस्थेबरोबर नियमानुसार योग्य तो करारनामा संबंधित महाविद्यालयाच्या अधिष्ठाता यांनी करणे अपेक्षित आहे. जेनेरिक औषधी केंद्रात जेनेरिक औषधे उपलब्ध नसल्यास ब्रँडेड औषधी मूल्यावर

# बारामती शहर विकासाचे रोल मॉडेल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## भव्य 'नमो महारोजगार मेळाव्या'सह विविध विकास कामांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**बारामती :** नमो महारोजगार मेळाव्यातून तरुणाईला स्वतःचे आणि राज्याचे भविष्य घडविण्याची एक मोठी संधी मिळाली आहे असे सांगतानाच बारामती येथे आयोजित या मेळाव्यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे असेही यावेळी ते म्हणाले. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने आयोजित पुणे विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बारामतीतील विविध विकास कामांतर्गत बऱ्हाणपूर येथील पोलीस उपमुख्यालय, बारामती बस स्थानक, अपर पोलीस अधीक्षक, वाहतूक शाखा, बारामती पोलीस ठाणे तसेच पोलीस वसाहतींचे उद्घाटन पोलीस वाहनांचे लोकार्पणही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात



लोढा, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते. मेळाव्यात तरुणाईला मार्गदर्शन मिळेल आणि रोजगारही उपलब्ध होईल. यापूर्वी नागपूर, लातूर, अहमदनगर येथे मेळावे झाले असून बारामती येथे आयोजित हा मेळावा सर्व विक्रम मोडणारा असून यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले,

बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. शहराच्या विकासात शरद पवार, अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. विकासकामे करताना सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कटाक्ष असतो. आज उद्घाटन झालेल्या प्रकल्पांच्या दर्जात कुठेही तडजोड झाली नाही हे दिसून येते.

राज्यात यापूर्वी नोकरभरती बंद होती. या शासनाने ७५ हजार रोजगार देण्याचे लक्ष्य ठेवले होते. त्या तुलनेत १ लाख ६० हजार रोजगार दिले आहेत. विविध नोकर भरती सुरू असून २२ हजार पोलिसांची भरती, ३० हजारावर शिक्षकांची पदे भरण्यात येत आहेत. त्यात मराठा समाजाला आरक्षण दिलेलेही समाविष्ट आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.शासन आपल्या दारी हा देखील राज्य शासनाचा लोकाभिमुख उपक्रम असून यात एकच छताखाली गरिबांना घरांचा, महिला बचत गट, शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर, पॉवर टिलर, ड्रोन, हार्वेस्टर आदी अनेक लाभ दिले. या कार्यक्रमातून २ कोटी ६० लाख लोकांना विविध लाभ देण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणाईला थेट नियुक्तीपत्रे देण्याचा कार्यक्रमांतर्गत जवळपास १० लाख युवकांना नोकऱ्या देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्य शासनही यात कुठेही कमी पडणार नाही. प्रधानमंत्री कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत १ कोटी ४० लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. नवीन शिक्षण धोरणामधील अभ्यासक्रमातही कौशल्य विकास अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेतून रोजगार देणारे हात निर्माण करण्याचाही शासनाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. गेल्या दोन वर्षात दाओस येथे जवळपास ५ लाख कोटींचे सामंजस्य करार झाले असून यातून ४ ते ५ लाख रोजगार निर्माण होणार आहेत.पोलीस हा कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करत असताना सणवार, उत्सव, आंदोलने आदी कालावधीत ऊन, पाऊस वाऱ्यामध्ये रस्त्यावर उभा असतो. म्हणून त्यांच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांना दर्जेदार सुविधाही दिल्या पाहिजेत. त्या बारामतीतील या पोलीस वसाहतीत दिल्या आहेत. राज्यातील सर्व बसस्थानके सर्व सोई सुविधायुक्त अशी सुसज्ज 'बसपोर्ट' करून प्रवाशांना सर्व सोई सुविधा देण्याचा शासनाचा प्रयत्न असून बारामतीमध्ये राज्यातील पहिले मॉडेल बसस्थानक झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बारामतीचे बस स्थानक एखाद्या विमानतळासारखे वाटावे असे आहे, तसेच येथील पोलीस ठाणे, पोलीस उपमुख्यालय, पोलीसाकरीता इमारती या सरकारी बांधकामासारखे न दिसता या एखाद्या कॉर्पोरेट कंपनीच्या कार्यालयासारखे वाटते. अतिशय सुंदर इमारती झाल्या असून बारामतीच्या वैभवात भर घालणाऱ्या वास्तूचे आज उद्घाटन करण्यात आले आहे. राज्यात इमारती बांधण्यासाठी या इमारतीचा आधार घेण्यात येईल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बारामतीतील विकासकामांचे कौतुक केले.ते पुढे म्हणाले, एकीकडे उद्योगांना मनुष्यबळाची असलेली आवश्यकता लक्षात घेऊन आणि विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज लक्षात घेऊन 'नमो महारोजगार मेळाव्या'चे आयोजन निर्णय घेण्यात आला आहे. मेळाव्याच्या माध्यमातून तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी मिळणार असून त्यांच्या हाताला काम देण्याचा हा उपक्रम आहे. रोजगार मेळाव्यात रोजगार मिळालेल्या उमेदवारांनी चांगले काम करावे.नागपूर येथे आयोजित पहिल्या नमो महारोजगार मेळाव्यात ११ हजार तरुणाला रोजगार मिळाले असून त्यापैकी काहींना ५० लाखापर्यंत पॅकेज मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बारामतीच्या वैभवात भर घालणाऱ्या चार सुंदर इमारतींचे आज लोकार्पण करण्यात आले. पोलीस उप मुख्यालयाच्या इमारतीसाठी १३२ कोटी रुपये, पोलीस वसाहत साठी ७५ कोटी रुपयांचा खर्च आला. बारामतीचे नूतन बस स्थानक महाराष्ट्रातील क्रमांक एकचे बस स्थानक आहे. खूप चांगल्या दर्जाची कामे झाली आहेत. विविध विकास कामांसाठी निधीची देखील कमतरता कमी पडू दिली जाणार नाही. पोलीस विभागाला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आज ३९ वाहनांचा लोकार्पण सोहळा पार पडला त्यात १४ महिला वाहन चालक आहेत. महिलांना देखील संधी प्राप्त करून दिली जात आहे. महाराष्ट्रात बारामती हा क्रमांक एकचा तालुका येण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.राज्याने जर्मनीबरोबर एक करार केला असून त्यांना ५ लाख कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यासाठी मनुष्यबळ कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आजच्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून अधिकाधिक उमेदवारांना रोजगार मिळवा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले,

विद्यार्थ्यां रोजगाराची गरज लक्षात घेऊन राज्यात नमो महारोजगार मेळाव्याच्या माध्यमातून राज्य शासन प्रयत्न करीत आहे. विद्या प्रतिष्ठानच्या माध्यमातूनही गेल्या ३ वर्षात सुमारे २ हजार ५०० विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमाला विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक मनोज कुसेकर, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# हिमाचलमधील पेच

काँग्रेसला आमदार निवडून आणता येतात; परंतु सांभाळता येत नाहीत. गुजरात, मध्य प्रदेश, गोवा, महाराष्ट्र, झारखंड, कर्नाटक तसेच अन्य राज्यात काँग्रेसला हा अनुभव आला आहे. पक्ष दुबळा झाल्याने काँग्रेसजणांची मुजोरी वाढली आहे. एकीकडे पक्ष सोडून जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यात पक्ष नेतृत्त्वाचा दबदबा कमी झाला आहे. जिथे काठावरचे बहुमत आहे, तिथे नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. पक्ष त्या पूर्ण करीत नसेल, तर महत्त्वाकांक्षेचे धुमारे फुटलेल्या नेत्यांना भाजप जवळ करतो आणि त्यांना हवे ते देऊन सत्तांतर करतो. पक्षादेशाला दुय्यम मानण्याची काँग्रेसच्या आमदार, खासदारांची प्रवृत्ती बळावली आहे. महाराष्ट्रात पुरेसे आमदार असताना विधान परिषदेच्या निवडणुकीत चंद्रकांत हंडोरे यांचा झालेला पराभव आणि आता हिमाचल प्रदेशाच्या राज्यसभा निवडणुकीत हमखास जिंकण्याची खात्री असलेल्या अभिषेक मनु संघवी यांचा झालेला पराभव हा काँग्रेस बेशिस्तीने कशी किडली आहे, हे दाखविते. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांच्या राजीनाम्याच्या बातमी आली, तेव्हा हा काँग्रेसच्या रणनीतीचा भाग असू शकतो असे वाटले होते; मात्र काही वेळाने त्यांनी राजीनामा दिला नसल्याचे स्पष्ट केले. सखू यांनी राजीनामा दिला असता, तर त्यातून मोठा संदेश गेला असता. हिमाचल प्रदेश काँग्रेस अध्यक्ष प्रतिभा सिंह आणि त्यांच्या मुलाला काँग्रेस नेतृत्वाकडून हा एक मजबूत संदेश गेला असता. राज्यसभेच्या निवडणुकीत क्रॉस-व्होट करणाऱ्या सहा काँग्रेस आमदारांसाठी सुखू यांची राजीनाम्याची ऑफर तारण ठरली असती. राज्यसभा निवडणुकीपर्यंत काँग्रेस सरकारला पाठिंबा देणाऱ्या तीन अपक्ष आमदारांसाठीही तितकीच महत्त्वाची ठरली असती. मंत्री विक्रमादित्य यांच्या राजीनाम्यामुळे सखू सरकार आकड्यांच्या खेळात अडकले. दिल्लीतून काँग्रेसने कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार आणि हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुडा यांना निरीक्षक म्हणून शिमल्यात पाठवले. कर्नाटकात दोन भाजप आमदारांचे क्रॉस व्होटिंग मिळाल्याने डीके शिवकुमार यांचा आत्मविश्वास वाढला आहे. याआधीही कर्नाटकातील संयुक्त जनता दल-काँग्रेस आघाडी सरकार वाचवण्यासाठी असे प्रयत्न करण्यात आले होते; मात्र प्रत्येक वेळी यश मिळाले नाही. हिमाचल प्रदेशात डीके शिवकुमारची नवी परीक्षा आहे. हिमाचल प्रदेशात काँग्रेसने रणांगण सोडलेले नाही. बंडखोर गट काँग्रेस नेतृत्वाच्या जाळ्याबाहेर नाही. काही गांभीर्याने प्रयत्न केले तर संपर्क प्रस्थापित होऊ शकतो आणि मन वळवण्याचे प्रयत्नही करता येतील. मध्य प्रदेश आणि कर्नाटकच्या तुलनेत काँग्रेसची स्थिती थोडी चांगली आहे असे म्हणता येईल.

हिमाचल प्रदेशातील सरकार वाचवण्यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे सध्या एकच पर्याय आहे, तो म्हणजे वीरभद्र सिंह यांच्या कुटुंबीयांना शक्य त्या मार्गाने पटवणे. हर्ष महाजन यांना राज्यसभेवर पाठवणे भाजपसाठी खूप अवघड होते. संख्यात्मक फरकही मोठा होता. काँग्रेसचे उमेदवार अभिषेक मनू सिंघवी यांना धोका नव्हता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशच्या चारही जागा परत मिळवता याव्यात आणि सत्ताही काबीज करता यावी, यासाठी भाजपने प्रयत्नांत अजिबात कसूर सोडली नाही. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह यांचा मुलगा विक्रमादित्य यांनी मंत्रिमंडळातून राजीनामा दिल्यानंतर परिस्थिती काँग्रेसच्या नियंत्रणाबाहेर गेल्याचे स्पष्ट झाले आहे. विक्रमादित्य यांनी राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यात सहभागी होण्याची घोषणा केली होती, तेव्हाच काँग्रेसला हे संकेत समजायला हवे होते. राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या भूमिकेतील चूक सुधारली होती, हे खरे आहे.

याआधी काँग्रेसच्या वक्तव्यात पक्षाचा कोणताही नेता अयोध्येला जाणार नाही, असे म्हटले होते. नंतर राहुल गांधी म्हणाले, की ज्याला विश्वास असेल तो जाऊ शकतो. विक्रमादित्य यांच्याप्रमाणेच निर्मल खत्री आणि आचार्य प्रमोद कृष्णम यांनीही पाठपुरावा केला आणि आता विक्रमादित्य आचार्य प्रमोद कृष्णम यांच्या मार्गावर पुढे जाताना दिसत आहेत. हिमाचल प्रदेशात सुरू असलेल्या राजकीय वादळात सुखू यांनी राजीनामा दिला असता, तर विक्रमादित्य यांचा राजीनामा हा डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न मानला गेला असता. सखू यांचा राजीनामा हा वीरभद्र सिंह कुटुंबीय आणि इतर नाराज आमदारांना शांत करण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जाऊ शकले असते. हिमाचल प्रदेशात भाजप महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे यांच्यासारखे विक्रमादित्य किंवा प्रतिभा सिंह यांना मुख्यमंत्रिपद देऊ शकते. तशाच प्रकारची ऑफर देऊन काँग्रेस बंडखोरांना हे पटवून देऊ शकते, की ते काँग्रेसमध्ये राहिल्यास त्यांची स्थिती अधिक चांगली होईल. अशा नाजूक काळात काँग्रेसने वीरभद्र कुटुंबीयांना कडक संदेश देणे गरजेचे झाले आहे. प्रतिभा सिंह आणि विक्रमादित्य यांना नेतृत्व बदला होईल, असे वाटते. ते त्यांच्या भावी रणनीतीवर पुनर्विचार करू शकतात, असा संदेश यातून देता आला असता. काँग्रेसची ऑफर कोणत्याही परिस्थितीत भाजपपेक्षा खूप मोठी ठेवताना ती केवळ प्रतिभा सिंह किंवा विक्रमादित्य यांना मुख्यमंत्री बनवण्यापुरती मर्यादित असता कामा नये.

काँग्रेससाठी हा काळ खूप कठीण आणि आव्हानात्मक आहे. वाटाघाटी करताना काँग्रेसची मोठी कसरत आहे. सुखू यांच्यावर अन्याय होता कामा नये. वीरभद्र कुटुंबीयांचीही समजूत काढली गेली पाहिजे. सहा बंडखोर आमदारांविरोधात पक्षांतरबंदी कायद्यानुसार कारवाई करताना पक्षच संपणार नाही, हे पाहिले पाहिजे. सहा बंडखोर आणि तीन अपक्ष आमदारांना बांधून ठेवताना बंडखोरांपुढे पक्ष हतबल झाला असे चित्रही जाता कामा नये.

प्रतिभा सिंह यांची समजूत घालण्याच्या प्रयत्नात काँग्रेसला हिमाचल प्रदेशात आणखी एक एकनाथ शिंदे होणार नाही, याचीही दखल घ्यावी लागेल. आता तोडगा निघाला, तरी काँग्रेसमधील दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या पर्यायांचा विचार काँग्रेस नेतृत्वाला करावा लागणार आहे. सखूच्या जागी काँग्रेस नेते राजेंद्र राणा आणि उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. हे दोघे योग्य वाटत नसतील तर काँग्रेस नेतृत्व आणखी पर्यायावर विचार करू शकते.

हिमाचल प्रदेशातही काँग्रेसचे नेतृत्व वाईट रीतीने अडकले आहे. पूर्वी मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये हेच दिसून आले होते. अशोक गेहलोत यांनी आपल्या कर्तृत्वाने राजस्थानमध्ये पाच वर्षे आपले सरकार चालवले; पण मध्य प्रदेशात कमलनाथ यांची निवड चुकली. छत्तीसगडमध्ये पक्षांतर दुहीची किंमत विधानसभेच्या निवडणुकीत मोजावी लागली. हिमाचल प्रदेशात काँग्रेसने राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या उलट प्रयोग केला होता. २०१८ मध्ये, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये, काँग्रेसने ज्योतिरादित्य शिंदे, सचिन पायलट आणि टीएस सिंह देव यांच्या नाराजीकडे दुर्लक्ष करून अनुक्रमे कमलनाथ, अशोक गेहलोत आणि भूपेश बघेल यांना मुख्यमंत्री केले. हिमाचल प्रदेशातील काँग्रेस नेतृत्वाने सुखविंदरसिंग सखूमध्ये ज्योतिरादित्य आणि पायलट यांची प्रतिमा पाहिली आणि प्रतिभा सिंह यांच्याकडे दुर्लक्ष केले.

काँग्रेस पक्षश्रेष्टींनी भाजपच्या पावलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु नंतरची परिस्थिती हाताळण्यात अपयश आले. समर्थकांचे समाधान करण्याच्या प्रयत्नात सखू यांनी दोन मंत्रिपदेही हिसकावून घेतली. या निर्णयामुळे नाराजी वाढणार होती. कारण प्रतिभा सिंह यांना त्यांच्या समर्थक आमदारांना मंत्री करायचे होते. काँग्रेसकडे हिमाचल प्रदेशात फारच मर्यादित आणि कठीण पर्याय शिल्लक आहेत आणि वेळ संपत चालली आहे

## महाराष्ट्र बँकेच्या वसुली पथकाच्या एजंटचा पालखी महामार्गावर हत्या

### दौंड तालुक्यातील वासुंदे हद्दीत घडली थरारक घटना

**पाटस :** जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर दौंड तालुक्यातील वासुंदे हद्दीत महाराष्ट्र बँकेच्या वसुली पथकाच्या एजंटचा अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने भोकसून हत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींच्या विरोधात कुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली. प्रविण मळेकर (वय ३०, रा. गुरुवार पेठ, आधार कॉम्प्लेक्स फ्लॅट नंबर ३०१, युको बँके समोर कस्तुरी चौक, पुणे) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून ही घटना शनिवारी (दि. २)रात्री ७.४५ वाजण्याच्या आसपास संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर वासुंदे हद्दीतील इंडियन ऑईल पंपा समोर घडली घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, प्रवीण मळेकर हे शनिवारी सकाळी ९.१५ वाजण्याच्या सुमारास हिरो होन्डा पॅशन मोटारसायकल (क्र.एम . एच १३ , इ.पी ९३३६ ) यावरुन बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बारामती या बँकेचे रिकव्हरीचे नोटीस वाटप करण्यासाठी राहत्या घरातून बारामती परिसरात गेले होते. ते नोटीस बजावुन घरी जात असताना रात्री पावणे आठ वाजण्याच्या आसपास कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी धारदार हत्याराने हल्ला करून कोणत्या तरी अज्ञात कारणाने त्यांच्यावर वार करून भोकसुन त्यांचा खून केला. दरम्यान , प्रवीण मळेकर यांना उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते ;मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले. याप्रकरणी मृत प्रवीण मळेकर यांचा मुलगा ऋषिकेश यांना दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने अज्ञात व्यक्तींच्या विरोधात दोन पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे . या घटनेचा अधिक तपास दौंड पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम राठोड हे करीत आहेत. दरम्यान , या गुन्ह्याचा सखोल तपास सुरू असून त्यासाठी एक पोलीस निरीक्षक,तीन पोलीस उपनिरीक्षक आणि १५ पोलीस कर्मचारी असे पथक तपासासाठी तैनात करण्यात आले आहे. लवकरच या गुन्हयाचा छडा लावून आरोपी जेरबंद करण्यात येईल,अशी माहिती पोलीस निरीक्षक यादव यांनी दिली.

### दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दुष्काळाच्या झळा

## विद्यापीठाची स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना फक्त कागदावरच

**पुणे :** प्रा. संजय सुर्यवंशी विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत


होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे नव्याने दुष्काळग्रस्तांसाठी स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना सुरू केलेली आहे. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद विद्यार्थ्या साहय्य योजना ही योजना २०२१ पासुन सुरू होऊन म्हणजे तीन वर्षे उलटुन देखील विद्यापीठातर्फे अजूनही दुष्काळ ग्रस्त विद्यार्थ्यांना मदत मिळाली नाही. त्यामुळे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठांनी दुष्काळग्रस्त विद्यार्थ्याबदल परीपत्रक काढुन शुद्ध फसवणुक केली असून ही योजना फक्त कागदावरच पाहायला मिळते आहे.

जाचक अटी रद्द करण्याची मागणी

या योजनेतुन अर्थिक मदत होईल असा अंदाज विद्यार्थाना होता.परंतु ही योजना कीती फसवी आहे. व विद्यार्थ्याच्या तोंडाला पाने कशी पुसली हे परीपत्रकाच्या नियम व अटी वरुन लक्षात येते. विद्यार्थ्यांना नाहक त्रास देण्याचा हा प्रकार असून भिक नको पण कुत्र आवर अशी गत झाल्याचे दिसत आहे. म्हणून या तुटपुंज्या फी साठी विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागणार आहे.त्यामुळे हे परीपत्रक बदलून या योजनेतील जाचक अटी रद्द करण्यात येऊन सरसकट फी माफ करण्यात यावी अशी मागणी स्टुडंट हेल्पींग हँडसचे अध्यक्ष अँड.कुलदीप आंबेकर यांनी केली आहे.

स्टुडंट हेल्पींग हँडसतर्फे दुष्काळ ग्रस्त विद्यार्थ्यांना मदतीचा हात

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यापीठात अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयात दुष्काळ ग्रस्त भागातील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आमच्या प्रतिनिधीने अनेक फोन लावून चौकशी केली असता त्यांनी स्टुडंट हेल्पींग हँडसतर्फे आमच्या जेवणाची व शैक्षणिक फी ची मदत करण्यात आली आहे असे विद्यार्थ्यांनी सांगितले. परंतु दुष्काळाच्या झळा एवढ्या तीव्र आणि व्यापक आहेत याची अनेक विद्यार्थ्यांना झळ बसते आहे. त्यामुळे विद्यापीठाने यामध्ये पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना मदत केली पाहिजे





**स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजनेच्या नियम व अटी**

**सदर योजना व्यवसायिक व अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार लागू राहील.**

**पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या चारही विद्याशाखेतील प्रत्येकी आठ हजार विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार १,०००- प्रमाणे एकुण ३२,००० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.**

**महाविद्यालये किंवा विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.**

**विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.**

**पुरग्रस्त दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थी म्हणून प्राचार्य, विद्यापीठ विभागप्रमुख यांनी शिफारस करणे आवश्यक राहील.**

**विद्यार्थ्यास या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही. विद्यार्थ्यास गैरशिस्त परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.**

**मी विज्ञान शाखेमध्ये प्रथम वर्षाला आहे मी माझ्या कुटुंबातील पहिला आहे जो आपले शिक्षण पूर्ण करत आहे. त्या मध्ये मला खूप अडचणींना सामोरे जावे लागत आहे. माझे आईवडील ऊसतोड कामगार आहेत. विद्यापीठ कडून व राज्य सरकारकडून अजुन मला कोणतीही स्कॉलरशिप मिळाली नाही. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यासाठी स्वामी विवेकानंद विद्यार्थी साहाय्य योजनेना विद्यापीठाने सुरु केली होती. या योजनेतुन अर्थिक मदत होईल असा अंदाज होता.परंतु या योजनेच्या नियम व अटी खूप किचकट आहेत.**

**-उमेश पाटोळे, दुष्काळग्रस्त विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विद्यापीठ मधे जेवणाचे खूप हाल होत असून घरची परिस्थिति नसल्याने दुष्काळ ग्रस्त विद्यार्थ्यांना एक वेळचे जेवण मिळणे कठिन झाले आहे. त्यात विद्यापीठ जर शैक्षणिक फी भरण्यास मदत नसेल करत तर अशा दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना पुढील वर्षाचा प्रवेश रद्द करून गावी जावे लागणार आहे.**

**-अँड.कुलदीप आंबेकर, अध्यक्ष, स्टुडंट हेल्पींग हँडसचे**

# यशवंत पंचायत राज अभियानात अक्कलकोट प्रथम ११ लाख रुपयांचा पुरस्कार

## गुणवंत अधिकारी अनिल जगताप व कर्मचारी महेश शेंडे यांचा गौरव




**सोलापूर -** प्रशासकिय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणारय-या पंचायत राज संस्थाना शासनातर्फे दिला जाणारा यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कारामध्ये पुणे विभागातील अक्कलकोट पंचायत समितीने प्रथम क्रमांक पटकाविला. ११ लाख रुपयांचा धनादेश व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. हा पुरस्कारण वितरण सोहळा पुणे येथे विधान भवन सेन्ट्रल हॉल याठिकाणी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पार पडला. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी तसेच सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा आव्हाळे मॅडम यांचे मार्गदर्शन तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादिन शेळकंदे व श्रीमती स्मिता पाटील यांचे मार्गदर्शनात पंचायत समितीने मार्गदर्शक सूचनानुसार कामकाज केले. तत्कालीन सिईओ पी टी वायचळ यांनी गुणवंत अधिकारी यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविले होते. अक्कलकोट पंचायत समितीच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, गट विकास अधिकारी सचिन खुडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी गुणवंत अधिकारी म्हणून सहाय्यक प्रशासन अधिकारी अनिल जगताप तर गुणवंत कर्मचारी म्हणून कनिष्ठ सहाय्यक महेश शेंडे कुर्डूवाडी यांचा विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करणेत आला.

यावेळी व्यासपीठावर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराज , उपायुक्त (विकास) विजय मुळीक, उपयुक्त अस्थापना राहुल साकोरे, विभागातील सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी , प्रकल्प संचालक , उपमुख्य कार्यकरी आधिकारी प्रशासन आदी उपस्थित होते. सण २००५ - २००६ या आर्थिक वर्षापासून स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून विभाग व राज्य स्तरावर राज्यातील पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत साठी हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये मागील वर्षामध्ये लोकहितासाठी केलेली विकास कामे, प्रशासकीय कामकाज, अस्थापनाविषयक कामकाज, केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांची अंमलबजावणी या कामकाजाचे मुल्यांकन विभागीय स्तरावरून व राज्य स्तरावरून तपासणी केली जाते . सदरील तपासणी करून केलेल्या गुणांकनाच्या आधारे अक्कलकोट पंचायत समितीस विभागीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले .

सदरील पुरस्कार स्वीकारण्यासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विन करजखेड, प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक, विस्तार अधिकारी महेश भोरे, वरिष्ठ सहाय्यक सिधय्या मठ, गणेश ग्राम, हेमंत ऐवळे आदी उपस्थित होते. पुरस्काराबद्दल पंचायत समिती अक्कलकोट चे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

## सूर्याला ढगांची सलामी, तापमानाला लागला ब्रेक!

### २४ तासांत पारा ५.६ डिग्री सेल्सियसने खाली



**नागपूर :** डोळे दाखविणाऱ्या सूर्याला ढगाळ वातावरणाने सलामी दिल्यामुळे वाढत्या तापमानाला ब्रेक लागला आहे. त्यामुळे गेल्या २४ तासांत पारा ५.६ डिग्री सेल्सियसने खाली उतरला आहे. शनिवारी सकाळपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे आज दिवसाचे तापमान ३१.६ डिग्री सेल्सियस होते. दुपारी ४ वाजता हलके उन पडले तर काही ठिकाणी सायंकाळी हलका पाऊस आल्याने वातावरण काहीसे सुखद झाले होते.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार हवेच्या वेगामुळे आकाशात ढगाळ वातावरणाची निर्मिती झाली. परिणामी विदर्भातील काही भागात त्याचा परिणाम बघायला मिळाला. सकाळी हवेचा जोर तीव्र होता. सायंकाळी हवेची गती प्रति तास ७.४ किलोमिटर होती. ढगाळ वातावरणामुळे सकाळी आद्रता ५१ टक्के होती. सायंकाळी ती ४६ टक्क्यांवर पोहचली.

मार्चच्या पहिल्याच आठवड्यात पारा ४० ला पार करण्याच्या तयारीत दिसत आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात शनिवारी कमाल तापमाण ३९.५ डिग्री सेल्सियसवर गेले होते. चंद्रपूर ३७.२ तर वाशिम ३७ डिग्रीवर होते. रविवारी हलक्या पावसाचा अंदाजनागपुरात रविवारीदेखिल ढगाळ वातावरणाचा अंदाज असून हवेचा वेग जास्त राहिल. त्यामुळे हलका पाऊस येण्याची शक्यता आहे. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात तापमान तीव्र होईल. पारा ४० ते ४२ डिग्रीच्या जवळ पोहचू शकतो. गेल्या एका दशकात ३१ मार्च २०१७ आणि २०१९ ला कमाल तापमान ४३.३ डिग्री नोंदविण्यात आले होते. तर, ४ मार्च १८९२ लानागपूरचेकमाल तापमान ४५ डिग्री सेल्सियस नोंदविण्यात आले आहे. हा दिवस आतापर्यंतचा मार्च महिन्यातील सर्वात गरम दिवस राहिला आहे.

# हडपसर भागातील विविध विकास कामासांठी सर्वात जास्त निधी आणला : प्रमोद भानगिरे

## अडीज वर्ष मुख्यमंत्री असताना निधी न आणणा-यां विरोधकांनी श्रेय लाटून नये

**हडपसर :** उद्धव ठाकरे अडीज वर्ग मुख्यमंत्री असताना हडपसर मतदार संघात एक रुपयाचा ही निधी न आणणाऱ्यांनी आमच्यावर टीका करू नये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर तीनशे कोटी रुपयांचा निधी राज्य शासन व पुणे महापालिकेच्या माध्यमातून हडपसर विधानसभा मतदारसंघात आणला, या निधीतून डीपी रस्ते व विकासकामे सुरु आहेत तर अनेक प्रकल्प मार्गी लागले आहेत विकासकामांमधून हडपसर परिसर व महंमदवाडी परिसराचा चेहरा मोहरा बदलणार आहे, न केलेल्या कामाचे फुकटचे श्रेय घेणाऱ्यांना करारा जबाब मिलेगा असा इशारा शिवसेना शहरप्रमुख माजी नगरसेवक प्रमोद नाना भानगिरे यांनी महंदवाडी येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

राज्य शासन व पुणे महापालिकेच्या माध्यमातून हडपसर विधानसभा मतदारसंघात प्रमोद भानगिरे यांच्या प्रयत्नातून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांची माहिती देण्यासाठी महंमदवाडी येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती या पत्रकार परिषदेमध्ये आपली भूमिका भानगिरे यांनी व्यक्त केली.



यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल घुले, उपशहर प्रमुख संतोष रजपूत, उप शहर प्रमुख विकी माने, विभागप्रमुख अभिमनू भानगिरे, महिला उपशहरप्रमुख स्मिता साबळे, जहीर भाई, सविता सोलंखे आदी यावेळी उपस्थित होते.

हडपसर मधील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे हा प्रश्न सोडवण्यासाठी हडपसर मधील तीन उड्डाणपुल पाडून फातिमानगर पासून ते लोणी काळभोर पर्यंत एकच मोठा उड्डाणपूल व्हावा व मेट्रोचे काम लवकर व्हावे यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भेटून निवेदन दिले आहे, लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना केल्या जातील , महंमदवाडीतील गावात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गावा बाहेरून डिपी रस्ते तयार करण्यात येणार आहेत , हडपसर भागातील मुंढवा, केशवनगर, मांजरी या भागात अनेक वर्षापासूनचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी निधीची तरतूद केली आहे. फुटबॉल मैदान, तसेच शासनाच्या जागेत क्रिकेट प्रेमींसाठीही मोठे मैदान करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे, हडपसर महंमदवाडी परिसरातील डीपी रस्ते व्हावेत यासाठी निधीची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली होती मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार डीपी रस्त्यांसाठी १२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हडपसर मधील वाढती गुन्हेगारी व पोलिसांचे संख्याबळ लक्षात घेता येथे आणखी दोन पोलीस स्टेशन व्हावेत म्हणून मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल, हडपसर विधानसभा मतदारसंघात नगरसेवक नसताना महापालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे सुरू आहेत आम्ही कामे करतो दुसरे श्रेय घेण्यासाठी पुढे येतात अडीच वर्षे त्यांचे मुख्यमंत्री असताना तुम्हाला एकही रुपया आणता आला नाही आणि आता आम्ही कामे करतोय तर त्याचे श्रेय घेता अशा विरोधकांना त्याच भाषेत उत्तर दिले जाईल असा इशाराही यावेळी भानगिरे यांनी दिला. निधीसाठी केलेल्या पाठपुराव्याचे पुरावे त्यांनी पत्रकार परिषदेत देऊन विरोधकांवर टीका केली.

लोकसभा निवडणुकीत शिवाजीराव आढळराव पाटील हेच उमेदवार असतील व ते निवडूनही येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तर विधानसभा निवडणुकीत संधी मिळाली तर दहा वर्षात हडपसर विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करणार असा दावाही नाना भानगिरे यांनी केला आहे.

### माजी नगरसेवक असताना विकास कामांचा डोंगर

**हडपसरमधील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी खासदार, आमदार अपयशी ठरले असताना शिवसेना शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी माजी नगरसेवक असताना देखील मोठ्या प्रमाणात निधी आणून नागरिकांची कामे केली आहेत हडपसर विधानसभा मतदारसंघाला मोठ्या प्रमाणात निधी मिळाला असून अनेक विकास कामे मार्गी लागली आहेत असे भानगिरे म्हणाले.**

# लाला को-ऑपरेटिव्ह बँकेवरील बंधने रिझर्व्ह बँकेकडून मागे

**नारायणगाव :** येथील लाला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला मार्च २०२३ पासून एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश आले आहे. बँकेची आर्थिकस्थिती व समाधानकारक कामकाज याचा विचार करून सन २०१९ पासून बँकेवर टाकलेली सुपरवायझरी बंधने रिझर्व्ह बँकेने मागे घेतली आहेत.

याबाबत बोलताना बँकेचे अध्यक्ष युवराज बाणखेले यांनी सांगितले की, एनपीएचे प्रमाण नियमापेक्षा जास्त असल्याने सन २०१९ पासून रिझर्व्ह बँकेने लाला बँकेवर सुपरवायझरी बंधने टाकली होती. त्यामुळे परवानगीशिवाय सभासदांना लाभांश जाहीर न करणे, कार्यक्षेत्र विस्तार, शाखा विस्तार न करणे आदी स्वरूपाचे निबंध रिझर्व्ह बँकेने घातली होती. रिझर्व्ह बँकेने लाला बँकेच्या आर्थिक व्यवहाराची व प्रशासकीय कामकाजाची तपासणी करून बँकेस तपासणी अहवाल सादर केला आहे. बँकेची आर्थिक परिस्थिती व समाधानकारक कामकाज याचा विचार करून बँकेवरील सर्व बंधने मागे घेत असल्याचे रिझर्व्ह बँकेने पत्रान्वये बँकेस कळविले आहे. बँकेस रिझर्व्ह बँकेकडून मोबाईल बँकिंगचा परवाना प्राप्त होईल. त्यामुळे ग्राहकांना अधिक चांगल्या प्रकारची सेवा देता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी डी. एन. सुरम म्हणाले, बँकेकडे ४२५ कोटी रुपयांच्या ठेवी असून, २८० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. एनपीएचे प्रमाण शुन्य टक्के आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप मोरे म्हणाले, बँकेचे सुपरवायझरी निर्बंध उठवल्यामुळे बँकेची कर्जवाटप मर्यादा वाढली असून, वैयक्तिक कर्जमर्यादा ४ कोटी ५० लाख रुपये; तर समूह कर्जमर्यादा ७ कोटी ५० लाख इतकी झाली आहे.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी लाला बैंकस नगर, सोलापूर, सातारा, रायगड आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये कार्य क्षेत्र विस्तार करण्यास मंजुरी दिली आहे. बँकेची ओतूर येथे नविन शाखा सुरू केली आहे. बँकेच्या चाकण शाखेचे पुणे- नाशिक हायवे, आंबेठाण चौकाजवळ लवकरच प्रशस्त जागेत एटीएम सुविधेसह स्थलांतर होणार आहे.**

**- जितेंद्र गुंजाळ, उपाध्यक्ष, लाला अर्बन बँक**

# भाजपा नेत्यांकडून चाळीस भक्तांची आयोध्या वारी

**बाणेर:** बाणेर,बालेवाडी,सुस,म्हाळुंगे या भागातून ४० भक्तांची टिम आयोध्या येथे प्रभू श्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी भाजपा कडून रवाना करण्यात आली.

अतिशय माफक दरात ही ट्रीप होत आहे भारतीय जनता पार्टीचे नेते, कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक एकत्र येऊन दर्शनासाठी जाणारे प्रत्येक व्यक्तीचा अर्धा खर्च स्वतः करत आहे प्रवास,नाष्टा,चहा,जेवण, पाणी बॉटल आणि दर्शन व्यवस्थाची कामे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते करत आहे म राज्याची जबाबदारी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री राजेश पांडे हे प्रभू श्रीरामाचे दर्शन जनतेला घडावे यांच्या कडे आहे या करिता हे अतिशय बारीक लक्ष देऊन सर्व व्यवस्था उपलब्ध करून देत आहे पूढील ट्रीप साठी माजी नगरसेविका ज्योती कळमकर आणि गणेश कळमकर यांचे जनसंपर्क कार्यालय बाणेर येथे नावनोदणी करावी अशी विनंती भाविकांना यांनी केली आहे.



### निमसोड येथे आज श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**वडूज :** निमसोड ता खटाव येथे आज श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती रविराज नलवडे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती अशी रविवारी दि ३ रोजी सकाळी ९ वाजता श्री गजानन महाराजांच्या मूर्तीस अभिषेक करण्यात येणार आहे. तर ९ते १२ कीर्तन होणार आहे. १२ वाजत आरती व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमानंतर सौ सुमन नलवडे यांचा शतकपूर्ती वाढदिवस समरंभ आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन रामचंद्र नलवडे, बबन नलवडे यांनी केले आहे.

# सातारा सार्वजनिक बांधकाम विभागात मॅनेजने ठराविक ठेकेदारांनाच लागती लॉटरी

**सातारा :** सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणजे दळणवळणाचे प्रमुख साधन निर्मिती करणारा विभाग आहे. या विभागामध्ये विकास कामे देताना मॅनेज पद्धतीने अगोदर कामे वाटली जातात. आणि त्याच्यानंतर चिठ्ठी टाकली जाते. असा गैरप्रकार सुरू आहे. या लॉटरी पद्धतीने कुणाचे रोकड व सोना चांदी होते. हे ठराविक पुढारी व त्यांचे चेले यांना चांगलेच माहिती आहे. या प्रकारामुळे बिचारे प्रामाणिक सुशिक्षित बेरोजगार अभियंता व संघटना अखेर चमत्काराची वाट पाहत आहे. कारण, रीतसर लिखित तक्रार नसल्याने सातारा जिल्ह्यातील लाच लुचपत प्रतिबंधक विभागालाही आता या ठिकाणी हात घालताना मर्यादा आलेले आहे. हे सुद्धा स्पष्ट झाले आहे.

याबाबत माहिती अशी की, सध्या मार्च एंडिंग ची धावपळ सुरू आहे. त्यामुळे अधिकारी वर्गांना सार्वजनिक बांधकाम विभागातील किती टक्के कामे झाले ? किती टक्के कामे पूर्ण होणार ? किती टक्के काम शिल्लक आहेत ?आणि किती टक्के खर्च झाले आहेत ?या सर्व टक्केवारीचे गणित सोडवताना अनेकांना कॅल्क्युलेटर घ्यावे लागते. काहींना अभ्यास करावा लागतो. तर काही जणांनी आपण विकास केलेल्या अर्थकारणामुळे आपल्या नेमका किती फायदा या कामात झालाय ? याचा हिशोब मांडावा लागतो. स्वतःची कधीकधी एम. बी. उतरावी लागते.याची आता धावपळ सुरू झालेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री रवींद्र चव्हाण हे सातारला दौऱ्यानिमित्त आले होते. त्यावेळी त्यांचं जंगी स्वागत करण्यात आले. काही ठेकेदारांनी तर चक्क बॅनरबाजी करून त्यांना आपली ताकद दाखवून दिली होती. एवढेच नव्हे तर सार्वजनिक बांधकाम विभागात रक्तदान शिबिर झाले. हे खरं म्हणजे सामाजिक जाणीव ठेवून केलेले काम आहे .त्याचे अनेकांनी कौतुक केले. पण काहींनी स्वतः चे रक्त न आठवता जो मलिदा लाटलेला आहे. त्याबाबत मात्र कधीच चर्चा होताना दिसत नाही.

प्रसिद्ध लेखक यांचे कोण म्हणतं टक्का दिला ? हे गाजलेले पुस्तक आहे. पण या सार्वजनिक बांधकाम विभागात कोण घेत नाही टक्का ?असं म्हणण्याची वेळ आलेली आहे.आज सार्वजनिक बांधकाम विभाग हा जरी प्रशांत महासागरासारखा शांत वाटत असला तरी इतरांच्या पाणबुडी देखरेखीमुळे अनेकांना बुडवण्याची ताकद आहे. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार ठेकेदार घाबरून असतात.

दे दान सुटे गिरण या वाक्य प्रमाणे आपल्या मागे गिरण लागू नये. म्हणून काहींना सुट नव्हे तर पाकीट बंद लिपापे द्यावे लागतात. आणि ही यंत्रणा नियमित कार्यरत आहे. लोकप्रतिनिधी बाबत खोके सरकार बोलले जाते पण सार्वजनिक बांधकाम विभागात दोन सराईत बोके आहेत . उघड्या डोळ्यांनी दोन बोके दुधासोबत मटणावर सुद्धा ताव मारत आहेत.

सातारा जिल्ह्यातील खासदार, आमदार व अनेक लोकप्रतिनिधी यांचे व ठेकेदारांचे एवढे हितसंबंध चांगले आहेत की ठेकेदारातूनच काही आमदारांनी मुकादम नेमलेले आहेत. हेच मुकादम कामवाटप समितीच्या माध्यमातून काही गरीब ठेकेदारांना मुका दम देत असतात. तर जे सराईत व भ्रष्टाचारांमध्ये काम करून दुधाची साई आपल्याकडे ओरबडून घेऊन जातात. त्यानंतर त्याची खावा बर्फी तयार केली जाते. या बर्फीचा आस्वाद अनेकांना मिळतो.

पूर्वी ठराविक ठेकेदार हे काम करत होते. पण, आता राजकारणामध्ये जर पुढे जायचे असेल तर ठेकेदारीतून दोस्ती आणि दोस्तीतून पैसा.... या दृष्ट चक्रात सातारा जिल्हा अडकून पडलेला आहे. ही सातारची बुगडी सांडली असून ती शोधण्याचा प्रयत्न कोणी करत नाहीत .हीच मोठी खंत आहे.

मार्च एंडिंग म्हटलं की सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अगदी अहमदनगर, संगमनेर, पुणे ,जालना, बीड, उस्मानाबाद ,लातूर या ठिकाणी काम करून आलेल्या अधिकाऱ्याच्या मागे काही जण हात घेऊन लागतात. कारण, जिथे पिकते तिथेच काढणी मोडणीला मजा येते. अशी आता नवीन प्रथा सुरू झालेली आहे. या सर्व गोष्टीचा आता विचार फक्त करायचा कारण कृती काहीच होत नाही.

त्यामुळे सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम म्हणजे सब भूमी गोपाळ की अशी झाली आहे. याला आता पायबंद घालण्यासाठी भ्रष्ट अधिकारी वर्गाच्या सेवानिवृत्तीचीच काही प्रामाणिक सुशिक्षित बेरोजगार अभियंता वाट पाहावी लागणार आहे. हे मात्र खरे...

# महायुतीत मोठे मित्र आल्याने आरपीआयच्या नाव कुठेही नाही : रामदास आठवले

**सातारा :** च्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीत शिवसेनेला मनसेचे राज ठाकरे यांचे मोठे आव्हान असताना आरपीआय पक्षाने मुंबई महानगरपालिकेत सत्ता मिळवून दिली. आता महायुतीला मोठे मित्र आल्याने आरपीआयच्या नाव कुठेही नाही. अशी खंत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी सातारा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

आर पी आय चे मतदार इमानदार आहेत .आर.पी.आय. मध्ये मोठा वर्ग आहे. सर्व राज्यात आर.पी.आय. पोचला असून विधानसभा निवडणुकीत २० ते २५ आमदार निवडून येऊ शकतात. लक्षदीप सारख्या ठिकाणी ६५ हजार मतदारांचा लोकसभा मतदारसंघ आहे. या ठिकाणी पक्षाची ताकद आहे.

काँग्रेस पक्षाची सत्ता असताना दलित पद दलित यांची कामे झाली नाहीत. याउलट नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात कामे झालेली आहेत. मुंबईतील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदु मिलचे स्मारक असो किंवा लंडनचे स्मारक असो ही काम गतीने झालेले आहेत. संविधान बदलणार हे काँग्रेसची अफवा आहे.

आज भारत जोडो अभियान राहुल गांधी राबवत आहेत. त्यांनी भारत जोडण्यापेक्षा काँग्रेस पक्ष जोडण्याचे काम करावे. कारण, काँग्रेस पक्ष सोडून अनेक जण गेलेले आहेत .अयोध्या येथे सम्राट अशोकाच्या काळात बुद्ध मंदिर होते. आगामी लोकसभा निवडणुकीत महायुतीचीच केंद्रात सत्ता येईल. कारण, महिला आरक्षण बिल, राष्ट्रीय महामार्ग व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास यश आलेले आहे.



**सातारा येथील रामदास आठवले यांच्या पत्रकार परिषदेतील मान्यवर (छाया निनाद जगताप ,सातारा-)**

दलित ,पद दलित व मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय यांनी काँग्रेसच्या जाळ्यात अडकू नयेत. महायुतीच्या ४५ जागा जिंकतील हा आमचा ओव्हर कॉन्फिडन्स नाही. असेही त्यांनी सांगितले. रिपब्लिकन पक्षाला सन्मान मिळावा. यासाठी आमचा प्रयत्न आहे .सातारा जिल्हा नियोजन मंडळावर अशोक गायकवाड यांची वर्णी लागावी अशी सूचना शंभुराज देसाई यांना केले असून सुरुवातीच्या काळात नाव नाही. मात्र, महामंडळ संचालक पद मिळावे .अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठा आरक्षण दहा टक्के दिलेले आहे .आता मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाची भाषा करू नये. राज्य सरकारच्या या निर्णयाबाबत न्यायालयाची याचिका दाखल केली आहे. या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले न्यायालयात उत्तर दिले जाईल. आरक्षण मिळवण्यासाठी आठ लाख रुपये ज्यांचे उत्पन्न आहे त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळतो . असेही त्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला आर.पी.आय. कार्यकर्त्यांनी नेहमीप्रमाणे गर्दी केली होती. त्यामुळे काही पत्रकार जागा शोधत होते. अखेर जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी सूचना केली. त्यानंतर पत्रकारांना जागा मिळाली. या पत्रकार परिषदेला महिला जिल्हाध्यक्ष पूजा बनसोडे, आप्पासाहेब गायकवाड ,अण्णा वायदंडे, संतोष भालेराव, कुणाल गडांकुश, प्रतीक गायकवाड, विशाल गायकवाड तसेच रोकडे ,डॉ. संपतराव कांबळे, आप्पा तुपे, सतीश रावखंडे आधी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते भूमी शिल्प या साप्ताहिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

# कचरा वेचक महिलांची सातार्‍यात रॅली

## विविध मागण्याठी वेधले प्रशासनाचे लक्ष

**सातारा :** आंतरराष्ट्रीय कचरा वेचक दिनानिमित्त शुक्रवारी साताऱ्यात कचरा वेचक महिलांनी साताऱ्यात रॅली काढली. शाहू चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या दरम्यान रॅली काढण्यात येऊन कचरा वेचक महिला संघटनांनी आपल्या विविध मागण्यांसाठी प्रशासनाचे लक्ष वेधले सुमारे दीडशे कचरा वेचक महिलांनी या रॅलीत भाग घेतला होता.



एक मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय कचरा वेचक दिन म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्त अवनी संघटनेच्या वतीने २००५ च्या बर्मन आयोगाच्या शिफारशीनुसार कचरा बेचकांना शहरात गावात नगरपालिका क्षेत्रात कचरा वर्गीकरणाच्या कामात सामावून घेण्यात यावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आज शुक्रवारी १ मार्च रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य रॅली द्वारे कचरा वेचकांनी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले.या निवेदनाद्वारे कचरा वेचकांसाठी राज्यात कल्याणकारी मंडळाची स्थापना करावी पावसाळ्यात कोकणात राबल्या जाणाऱ्या खावटी योजनेप्रमाणे कचरा वेचक महिलांना खावटी योजना लागू करावी आदी मागण्यांचं हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी साताप्पा मोहिते, महेश मोहिते, रसिका लोखंडे यांनी या रॅलीचे नेतृत्व केले.

# मराठी भाषा सर्वार्थाने परिपूर्ण : साहित्यिक सुरेश शिंगटे

**सातारा :** अडीच हजार वर्षांचा इतिहास लाभलेली मराठी भाषा सर्वार्थाने परिपूर्ण अशी भाषा आहे. ज्ञानाचा मोठा खजिना या भाषेत असून ज्ञानोबा-तुकोबांनी या भाषेला समृद्ध केले आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण कथाकार सुरेश शिंगटे यांनी केले.

येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित केलेल्या मराठी भाषा गौरव दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शिंगटे बोलत होते. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. जयश्री आफळे होत्या. यावेळी कला शाखेच्या उपप्राचार्या प्रो. डॉ. सुनिता घार्गे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रो. डॉ. एस.एस. पवार, मराठी विभागप्रमुख डॉ. आबासाहेब उमाप, हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. जी. एस. भोसले व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश टोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिंगटे पुढे म्हणाले, मराठी भाषेत असलेली मौखिक परंपरा अतिशय महत्त्वाची असून या परंपरेने भाषेचे भरणपोषण केले आहे. काळाच्या ओघात विदेशी भाषांचे मातृभाषेवर आक्रमण होत असले तरी भाषेच्या व्यवहारीक वापराची जबाबदारी आपल्यावर आहे. भाषेला मानवी जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. भाषा संस्कृतीचे वहन करत असते.

# जितेंद्र वाडेकर यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**सातारा :** सातारा पालिकेच्या घनकचरा टेंडर प्रक्रियेमध्ये स्वातंत्र्यवीर विधान सावरकर स्वयंरोजगार संस्था मॅनेजमेंट पुणे यांना समाविष्ट करून घेऊ नये अशी मागणी साताऱ्याचे सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र वाडेकर यांनी मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्याकडे केली आहे.

याबाबत साधन निवेदनात नमूद आहे की मार्च २०२० ते जून २०१३ चा खेळ या दोन्ही कंपन्यांकडे घंटागाडी संकलनाचा ठेका देण्यात आला होता. मात्र या दोन्ही संस्थांनी अटी व शर्ती यांचा अभंग करून पालिकेचे नुकसान केले आहे ओला व सुका कचरा याचे वर्गीकरण करण्यात आलेले नसून त्यांच्याकडे वाहने तांत्रिकदृष्ट्या दुरावस्थेत होती तसेच संबंधितांनी शासनाचा जी.एस.टी. सुद्धा येणे बाकी असून संबंधित कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी दिलेला नाही याच दोन कंपन्या पुन्हा आगामी घंटागाडीच्या टेंडर प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छित आहेत या ठेकेदारांना काळी यादी टाकण्यात यावे तसा पत्रव्यवहार संबंधित कंपन्यांना कळविण्यात यावा या कंपन्यांना ठेका दिल्यास सातारा शहरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून याकरिता आरोग्य यंत्रणा जबाबदार राहील असा इशारा वाडेकर यांनी दिला आहे.

या दोन्ही कंपन्यांना काळा यादी टाकून त्याचा अहवाल सादर करांना कळविण्यात यावा अशी मागणी वाडेकर यांनी केली आहे.

# समृद्धी'ला शिंदे-फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे भगदाड; पटोलेंचा गंभीर आरोप

**मुंबई** - राजधानी मुंबई तेनागपूर७०० किलोमिटरच्यासमृद्धी महामार्गाचाशिंदे-फडणवीस सरकारने मोठा गाजावाजा केला, जाहिरातबाजी करुन पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटनही केले. १२ तासात मुंबईहूननागपूरलापोहचणार असा दावा करणाऱ्या महामार्गाचेच १२ वाजले आहेत.

समृद्धी महामार्गपहिल्यापासूनच वादग्रस्त ठरला आहे. सातत्याने होत असलेल्या अपघाताचा प्रश्न असताना आता या महामार्गावरील एका पुलाला मोठा खड्डा पडला आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे समृद्धी महामार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह तर निर्माण झाले आहे. पुलावर पडलेला हा केवळ खड्डा नसून 'समृद्धी'ला शिंदे-फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे पडलेले हे भगदाड आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्षनाना पटोलेयांनी केला आहे.-ऊतएठढखडएचएछढ-वी लूकाँग्रेस प्रदेशाध्यक्षनाना पटोलेम्हणाले की, अमरावती



जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावजवळच्या पुलाला खड्डा पडल्याच्या

बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अवघ्या १४ महिन्यातच पुलावर भला मोठा खड्डा पडल्याने या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यात व बांधकामात त्रुटी असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या,

परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. नागपूर-मुंबई समृद्धी हा ५५ हजार कोटी रुपयांचा महामार्ग सुरुवातीपासूनच भ्रष्टाचाराचे कुरण ठरला आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले. महामार्गाने कोणाची समृद्धी केली - पटोलेमहामार्गासाठी जमीन संपादन करताना मोठा भ्रष्टाचार झाला.

तसेच या महामार्गाच्या तांत्रिक बाबीमध्येही गडबड आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यासाठी तज्ज्ञांच्या विशेष पथकाला हजारो कोटी रुपये दिले पण अपघाताचे प्रमाण पाहता रस्ते बांधणी करताना फारशी काळजी घेतल्याचे दिसत नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आणि एक्स्प्रेस वे साठी साठी निश्चित केलेले नियम पाळलेले नाहीत. रोड हिप्नॉसीसमुळे अपघात होतात असे काही काही तज्ज्ञांनी सांगितले आहे, त्यावर काही उपाय केलेले नाहीत. रस्त्यावर ठरावीक अंतरावर चहापाणी, हॉटेल आणि स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत. त्यात आता रस्त्याला भगदाड पडल्याने या महार्गाने कोणाची समृद्धी केली हे दिसत आहे, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

# दादा गृहखातं मागतील पण मी देणार नाही

## देवेंद्रफडणवीसांची अजित पवारांवर स्तुतीसुमने

**बारामती (पुणे) :** बारामतीचीविकासकामे पाहून मी प्रभावित झालो आहे. दादा मी तुम्हाला विनंती करू इच्छितो की, तुम्ही स्वत: लक्ष घालून एवढ्या चांगल्या इमारती बांधल्या. आता मला मोह होत आहे की, आपल्या पोलिस विभागाच्या जेवढ्या इमारती आहेत, तिथे पीएमसी म्हणून तुम्हालाच नियुक्त करावे. म्हणजे सगळ्या इमारती चांगल्या होतील. अर्थात दादा मला हळूच म्हणू शकतील की, पीएमसी कशाला खातंच माझ्याकडे द्या. पण दादांना खातं देणार नाही, ते माझ्याकडेच ठेवेन, अशी मिश्किल टिपणी उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी केली.-ऊतएठढखडएचएछढ-वी लूबारामती येथे आयोजित विविध



विकासकामांच्या उद्घाटनासह नमो महारोजगार मेळाव्यात उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नमो महारोजगार मेळावा हा तरुणांच्या हाताला काम देण्याचा उपक्रम आहे. या माध्यमातून बारामतीत ५५ हजार तरुणांच्या हाताला रोजगार देण्यात येत आहे. उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्या पुढाकारातून पश्चिम महाराष्ट्रात बारामतीत हा मेळावा होत आहे. त्यासाठी त्यांनी मोठी मेहनत घेतली आहे.अजित पवार यांच्या नेतृत्वात बारामतीचे बसस्थानक एअरपोर्टप्रमाणे निर्माण केले आहे. तर कॉर्पोरेट कंपनीप्रमाणे पोलिस उपमुख्यालयाची इमारत बांधण्यात आली आहे. हे बांधकाम सरकारी आहे, असे वाटतच नाही. आता माझ्यामागे लोक इथे पोस्टिंग देण्यासाठी लागतील. कारण एवढं चांगल कार्यालय आणि निवासस्थान केवळ बारामतीमध्येच आहेत.....तर आम्ही सगळे एकत्रित चांगले काम करूमेळावा जाहीर झाल्यापासून गेले दोन-तीन दिवस माध्यमांना उद्योग लागला. त्यांचे मी आभार मानतो. त्यांनी मेळाव्याला प्रचंड प्रसिद्धी दिली. हा मंच याचा साक्षीदार आहे. एखादं चांगल काम करायचं असेल तर राजकारण बाजूला ठेवत सर्वजण एकत्र येतात. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला आधार देण्यासाठी आम्ही सगळे मिळून चांगले काम करू शकतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महारोजगार मेळाव्याबाबत चाललेल्या वृत्तांवर भाष्य केले. राजकारणात काम करणारे आम्ही सगळे कंत्राटी कामगार आहोत. आमचे कंत्राट दर पाच वर्षांनी 'रिनिव्ह' होते. आम्ही चांगले काम केल्यास आमचे कंत्राट रिनिव्ह होते. अन्यथा लोक आम्हाला घरी बसवितात. मात्र, मेळाव्यात चांगले काम केल्यास कायमचा रोजगार मिळेल, जन्मभर तुमची प्रगतीच होणार आहे, अशा प्रकारचा हा महारोजगार मेळावा आहे, अशी मिश्कील टिपणीही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

# शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलासा नाही!

**मुंबई :** शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना वर्ग दोनमधून वर्ग एकमध्ये (मालकी हक्क) रूपांतर करण्यासाठी रेडी रेकनरच्या १५ टक्केऐवजी पाच टक्के दराने भूखंडाची किमत अदा करण्याची सवलत देण्याबाबत राज्य शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. मात्र ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था रेडी रेकनरच्या १५ टक्के दराने भूखंडाचा मालकी हक्क संपादन करण्यास इच्छुक आहेत, त्या संस्थांना आता आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना रेडी रेकनरच्या १५ टक्के रक्कम अदा करून मालकी हक्क देण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने ८ मार्च २०१९ रोजी घेतला होता. त्यावेळी तीन वर्षांची मुदत देण्यात आली होती. त्यानंतर या मुदतीत आणखी दोन वर्षांची वाढ देण्यात आली. आता ही मुदत ७ मार्च २०२४ रोजी संपत आहे. त्यात आणखी तीन महिन्यांची वाढ देण्यात आली असून आता ही मुदत ७ जून २०२४ असेल. याबाबतचे पत्र महसूल विभागाचे उपसचिव धनंजय निकम यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले आहे. त्यामुळे सवलतीच्या प्रतीक्षेत असलेल्या गृहनिर्माण संस्थांना आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे.

रेडीरेकनरच्या १५ टक्के या दराने मोठी रक्कम भरावी लागत असून सदस्यांची ऐपत नसल्याचे गाऱ्हाणे सहकारी गृहनिर्माण संस्थांनी शासनाकडे मांडले आहे. हा दर कमी करण्याची मागणी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या महासंघाने केली आहे. याबाबत काही आमदारांनीही शासनाकडे दर कमी करण्याची मागणी केली होती. अखेर हा दर पाच टक्के केला जाईल, असे महसूल मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी गेल्या वर्षी विधिमंडळात घोषित केले. याबाबत उच्च न्यायालयातही शासनाने अधिसूचना काढली जाईल, असे सांगितले होते. परंतु याबाबत अद्यापही अधिसूचना काढण्यात आलेली नाही. आतापर्यंत सरकारच्या या योजनेला सहकारी गृहनिर्माण संस्थांचा अजिबात प्रतिसाद मिळालेला नाही. शहरात फक्त एका सहकारी गृहनिर्माण संस्थाने याचा लाभ घेतला आहे. अशा वेळी शासनाने सवलत न देता फक्त तीन महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील हजारो रहिवाशांना फटका बसणार आहे. अधिवेशनाचे सूप वाजले असले तरी अद्याप आचारसंहिता जारी झालेली नसल्यामुळे सवलतीबाबत निर्णय होऊ शकतो.

# 'ससून'चा तृतीयपंथीयांचा स्वतंत्र वॉर्ड रिकामा, सध्या एकही रुग्ण दाखल नाही

**पुणे :** ससून रुग्णालयात तृतीयपंथीय (ट्रान्सजेंडर) रुग्णांच्या उपचारासाठी नव्या इमारतीमध्ये गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात स्वतंत्र वॉर्ड तयार केला. मात्र, या वॉर्डमध्ये तृतीयपंथीयांचा उपचारासाठी अल्प प्रतिसाद दिसून येत आहे. सध्या येथे एकही तृतीयपंथीय रुग्ण उपचारासाठी नाही.

तृतीयपंथीय रुग्णांना उपचारात भेदभावाची वागणूक मिळू नये, यासाठी हा वॉर्ड तयार केला गेला. त्यांच्या शारीरिक गरजाही इतर रुग्णांच्या तुलनेत वेगळ्या असतात. त्यासाठी संपूर्ण राज्यातच शासकीय वैद्यकीय रुग्णालयांत तृतीयपंथीयांसाठी हा वॉर्ड गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात सुरू करण्यात आला होता. या वॉर्डचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी हा वॉर्ड सजवण्यात आला होता. या वॉर्डमध्ये १५ बेड असून, दोन अतिरिक्त आयसीयू बेड आहेत.या वॉर्डमध्ये सध्या किती रुग्ण उपचार घेत आहेत? याबाबत ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांना विचारले असता ते म्हणाले की, सध्या या वॉर्डमध्ये एकही रुग्ण नाही;



परंतु भविष्यात असे रुग्ण आल्यास त्यांच्यासाठी हा वॉर्ड सज्ज आहे; तसेच गेल्या आठ महिन्यांत फार थोड्या रुग्णांनी यामध्ये उपचार घेतले आहेत. या वॉर्डमध्ये अधिकाधिक रुग्णांनी उपचार घ्यावेत, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.ट्रान्सजेंडर कार्डच्या मागणीमुळे अल्प प्रतिसादपुण्यातील तृतीयपंथीयांची संख्या सुमारे पाच हजार आहे. 'ससून'मध्ये उपचार घेण्यासाठी ट्रान्सजेंडर कार्डची मागणी केली जाते. बहुतेक तृतीयपंथीयांकडे ते कार्ड नाही. त्यामुळे, त्यांना त्या वॉर्डमध्ये दाखल करून घेण्यात येत नाही, अशा भावना काही तृतीयपंथीयांनी व्यक्त केल्या.

तसेच, याबाबत त्यांच्या उपचारासाठी असा काही स्वतंत्र वॉर्ड तयार करण्यात आलेला आहे, याबाबत माहिती नसल्यानेही या वॉर्डमध्ये उपचारास प्रतिसाद मिळत नसल्याचे त्यांचे मत आहे. ससून रुग्णालयात थर्ड जेंडर वॉर्ड तयार झाला असून एका बाजूला खेद व्यक्त केला जात आहे.

त्या वॉर्डमध्ये पारलिंगी महिला यांची संख्या कमी दर्शवीत आहे.पुणेमहानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यातून सुमारे ६ ते ७ हजार पारलिंगी महिला आणि पुरुष यांची नोंद असून त्यांनी या रुग्णालयात उपचार घेणे सुरू करणे अपेक्षित आहे; परंतु वॉर्डमध्ये तृतीयपंथी ओळखपत्र नसल्यास किवा शस्त्रक्रिया झाल्यावर लगेच डिस्चार्ज दिला जात आहे. त्यामुळे महिना सुमारे ४ ते ५ जण या वॉर्डमध्ये उपचार घेताहेत. कागदपत्र पूर्तता याची पडताळणी करूनच डमिट केले जाते आहे. संबंधित संस्था या ठिकाणी जाऊन चौकशी केल्यावर उपचार पूर्ण होताना दिसत आहे. या ठिकाणी आजही जेंडर न्यूट्रल टॉयलेट उपलब्ध नाही.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीर बीडमध्ये 'सकल मराठा' समाजाने घेतला 'हा' निर्णय!

**बीड :** सरकारने दिलेले १० टक्के आरक्षण मान्य नाही, सगेसोयरे अधिसुचनेचे कायद्यात रुपांतर करावे, या मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीवर समाज आजही ठामपणे त्यांच्या मागे उभा आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत प्रत्येक गावांतून दोन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविण्याचा ठराव, शनिवारी बीडमध्ये झालेल्या 'सकल मराठा' समाजाच्या बैठकीत घेण्यात आला. यानंतर भाजपचे तालुकाध्यक्ष ड. स्वप्नील गलधर यांनी देखील मीही रिंगणात आणि मीही खासदार असे जाहीर केले.

गलधर यांनी बैठकीत घेतलेली भूमिका सोशल मिडीयावरही जाहीर केल्यानंतर समाजातून उस्त्फुर्त प्रतिक्रिया तर आल्याच शिवाय भाजपाच्या अनेकजणांच्या भुवयाही यामुळे उंचावल्या आहेत. या बैठकीत प्रत्येक गावातून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात दोन उमेदवार उभा करण्याचा ठराव झाला. अडीच हजारांहून अधिक उमेदवार निवडणूक रिंगणात असतील, अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

या बैठकीत अनेकांनी आपणही उमेदवारी अर्ज भरण्याचे जाहीर केले. मात्र, भाजपा तालुकाध्यक्ष असलेले व मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जाणाऱ्या स्वप्नील गलधर यांच्या भूमिकेमुळे भाजपातील अनेकजणांच्या भुवया उंचावल्या आहेत.

आरक्षण नाही तर निवडणूक नाही, अशी घोषणा यावेळी करण्यात आली. कोणत्याही निवडणुकीमध्ये चारशेहून अधिक उमेदवारांची संख्या झाली तर ती निवडणूक रद्द करावी लागते, यासाठी हा निर्णय घेत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मनोज जरांगे जो ि0वीनर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, राजकीय स्टेजवर आणि कार्यक्रमांना समाज जाणार नाही, १० टक्के आरक्षण मान्य नाही, सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करावी, आदी ठराव यावेळी घेण्यात आले.

# इचलकरंजीच्या पाणीप्रश्नी सरकारकडून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न

## शहरवासीयांतून तीव्र नाराजी

**इचलकरंजी :** शहरासाठी मंजूर केलेली दूधगंगा-सुळकूड योजना कार्यान्वित करण्यासाठी बैठक आयोजित केली असताना त्यामध्ये पुन्हा तज्ज्ञ समिती नेमून चालढकल केली जात आहे. त्यामुळे शहराच्यापाणीप्रश्नावर सरकारकडून वेळ मारून नेण्याचा प्रकार सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडणुकीपूर्वी यावर योग्य निर्णय न झाल्यास विद्यमान आमदार, खासदारांनापाणीप्रश्न भोवणार आहे.

शहराला स्वच्छ व मुबलक पाणी देणार, यावर मुख्यमंत्र्यांसह सर्वांचे एकमत आहे; परंतु उपसा करण्यासाठी नदी बदला, असे मत कागलकरांचे आहे. शहराला पाणी देण्यासाठी प्रत्येक वेळी होणारा विरोध चुकीचा आहे, असे मतइचलकरंजीकरांचेआहे. मुळात शासनाच्या वतीने सर्व बाबींचा अभ्यास करूनच या योजनेला मंजुरी दिली. त्यानंतर १६५ कोटी निधीची तरतूद केली. या टप्प्यावर विरोध न करता थेट योजना कार्यान्वित करताना विरोध करणे गैर असून, राजकारण बाजूला ठेवत या प्रश्नावर एकमत व्हावे, असे शहरवासीयांचे म्हणणे आहे.

दोन्हींकडील जनतेच्या भावना



पाहता मुख्यमंत्र्यांनी याबाबत बैठक लावली; परंतु त्यामध्ये योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात निर्णय झाला नाही, हे इचलकरंजीच्या प्रतिनिधींचे अपयशच आहे.

आता पुन्हा तज्ज्ञ समिती नेमून त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील चर्चा करून निर्णय होईपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून जाणार आहे. शासन शहराला पाणी देण्यावर ठाम असले तरी इचलकरंजीकरांनी कृष्णेतूनच पाणी घ्यावे, अशी त्यांची भूमिका असल्याचे दिसत आहे. त्यासाठी वारणा, दूधगंगा अशा उपनद्यांवर अवलंबून न राहता शहराने कृष्णेसारख्या मुख्य नदीतून पाणी उपसावे. भविष्यातील शहराची गरज पाहता कायमस्वरूपी पाणी मिळण्यासाठी कृष्णा योग्य आहे. त्यासाठी सध्या उपसा सुरू असलेल्या मजरेवाडी (ता. शिरोळ)च्या दोन किलोमीटर पुढे शिरटी येथून पाणी उपसा करावा. त्यासाठी अत्याधुनिक पाइपलाइन करून मुबलक व शुद्ध पाणी घ्यावे. पाण्याचे नमुने तपासावेत, वॉटर ऑडिट करावे, अशा बाबींचा समावेश आहे.

दूधगंगा उपनदी असल्याने परिसरातील गावांना होणारा पाणीपुरवठा जनावरे, चारा, शेती यासाठी पाण्याचे नियोजन पाहता शहरवासीयांनी दूधगंगेचा हट्ट सोडावा आणि शुद्ध व मुबलक पाणी मिळणारा स्रोत म्हणजेच कृष्णा योजना बळकट करावी, असाच सूर सध्या दिसत आहे.

# प्री-मोफत शिक्षण विसरा

# साडेसात हजार शाळा 'आरटीई'मधून बाहेर

**सांगली:** आरटीई कायद्यात सुधारणा करून शासनाने वर्षाकाठी शेकडो कोटी रुपयांच्या प्रतिपूर्तीच्या ओझ्याखालून सुटका करून घेतली आहे. राज्यातील आठ हजार खासगीशाळांपैकीसुमारे सात हजारांहून अधिकशाळाया कायद्यातून बाहेर पडणार आहेत. खासगी शाळांत पाल्याला मोफत शिकवण्याचे पालकांचे स्वप्न मात्र भंग होण्याचीही शक्यता आहे.

सरकारी शाळांमध्ये शिक्षकांच्या पगारासह अन्य बाबींसाठी हजारो कोटींचा खर्च शासन करते, तरीही आरटीई प्रवेशासाठी प्रतिविद्यार्थी दरवर्षी कमाल १७,५०० रुपये खासगी शाळांना द्यावे लागतात. वर्षाकाठी हा बोजा शेकडो कोटींवर जातो. हे लक्षात घेऊन नवा बदल करण्यात आला आहे. शासकीय व अनुदानित शाळांमध्ये चांगल्या सुविधा असूनही त्या आरटीईमध्ये नसल्याने पटसंख्या





कमी होत आहे. शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. आरटीईमधून प्रवेशित विद्यार्थ्याला खासगी शाळेच्या फक्त शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत मिळते. तेथील अन्य सुविधा मिळत नाहीत. पालकांनाच पैसे मोजावे लागतात. राज्यात सरासरी १८ लाख विद्यार्थी दरवर्षी पहिलीत प्रवेश घेतात. त्यापैकी ८५ हजार विद्यार्थ्यांनाच आरटीईनुसार खासगी शाळांत मोफत प्रवेश मिळतो.-ऊतएठढखडएचएछढकाय आहे नवा नियम?

एखाद्या खासगी शाळेच्या एक किलोमीटर अंतरात शासकीय, अनुदानित किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची शाळा नसेल, तरच या खासगी शाळेत आरटीई नियम लागू असेल. या नियमानुसारसांगली, मिरज, कुपवाड महापालिका क्षेत्रातील ९९ टक्के शाळा आरटीईतून बाहेर पडल्या आहेत. सांगली, मिरजेतील जवळपास सर्वच खासगी शाळांपासून एक किलोमीटरच्या अंतरात महापालिका किंवा जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. त्यामुळे खासगी शाळा आता आरटीईमध्ये नसतील.सांगली जिल्ह्यात २२६ शाळा

सांगली जिल्ह्यात आरटीई कायद्यात २२६ शाळांचा समावेश आहे. २५ टक्के सक्तीच्या प्रवेशानुसार तेथे दरवर्षी १८८६ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळतो. नव्या नियमानुसार किमान २०० शाळा आरटीईतून बाहेर पडणार आहेत. जिल्हाभरात अवघ्या दोनशे-तीनशे जागाच शिल्लक राहण्याची शक्यता आहे.२४०० कोटी रुपये थकीत

राज्यातील आठ हजार शाळांना प्रतिपूर्तीपोटी शासनाकडून २४०० कोटी रुपये येणे थकीत आहेत, ते मिळावेत यासाठी खासगी शाळा पाठपुरावा करत आहेत. काही शाळांनी न्यायालयाचे दरवाजेही ठोठावले आहेत. प्रतिपूर्तीचे पैसे देताना प्रशासन अनेक त्रुटी काढत पैसे अडवत असल्याची तक्रार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्रुटी दिसल्या नव्हत्या का? असा शाळांचा प्रश्न आहे.सरकारी शाळांचा पट वाढणार


नव्या नियमामुळे सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच अनुदानित शाळांची पटसंख्या वाढणार आहे. अतिरिक्त शिक्षकांची समस्याही संपुष्टात येणार आहे. खासगी शाळांमध्ये गुणवत्तेसाठी पाल्याचा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांची मात्र निराशा होणार आहे. त्यांना सरकारी शाळेत प्रवेश घ्यावा लागेल किंवा खासगी शाळांत शुल्क भरून प्रवेश मिळवावा लागेल.

# दिल्लीतील शेतकरी आंदोलनाचा गहू काढणीवर परिणाम

**छत्रपती संभाजीनगर :** दिल्ली-हरियाणा सीमेवर सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाचा परिणाम महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील गहू काढणीवर जाणवू लागला आहे. 'हार्वेस्टर'द्वारे गहू काढणी होत असलेल्या ठिकाणी चालकच उपलब्ध होत नसून, दर वर्षी दोन हजारांच्या संख्येने येणारे चालक आतापर्यंत ३०० ते ४०० च्या आसपासच दाखल झालेले आहेत.

महाराष्ट्रातील अनेक हार्वेस्टरमालकांचे अग्रणी रक्कम म्हणून दिलेले पैसेही पंजाबमधील चालकांकडे अडकून पडले असून चालकांपुढेही दिल्लीतील शेतकरी आंदोलन आणि नाकाबंदीची परिस्थिती पार करत येणे अडचणीचे ठरत आहे.

महाराष्ट्रात नोव्हेंबर किंवा त्यानंतरच्या पेरणीतील गव्हाच्या काढणीचा हंगाम सुरू झाला आहे. १५ फेब्रुवारीपासून गहूकाढणीच्या



कामाला वेग आला असून, अलीकडच्या काळात शेतीत मजुरांची टंचाई, त्यांची वाढलेली मजुरी किंवा अधिकच्या संख्येने मजूर लावून काम करून घेताना होणारा खर्च पाहता शेतकरीवर्ग हार्वेस्टरद्वारे गहूकाढणीला पसंती देत आहे. परिणामी हार्वेस्टरमालकांचीही संख्याही वाढली आहे. मराठवाड्यासह शेजारच्या नगर जिल्ह्यात मागील तीन वर्षांत ३०० च्या आसपास हार्वेस्टरची विक्री झाल्याची माहिती आहे. हार्वेस्टरने एका दिवसात पाच ते दहा एकरवरील गहूकाढणी होते.

मराठवाड्यात हार्वेस्टरची संख्या वाढत असली, तरी ते अनेकांना चालवणारे मात्र, पंजाबमधून आणावे लागतात.